
गुजरातच्या लोककथा

पुनर्कथन व चित्रांकन

**आबिद सुरती**



# गिजुभाईंच्या गोष्टींचा खजिना

भाग १

वाचन पातळी ३

Pathfinders C12001

# गिजुभाईंच्या गोष्टींचा खजिना

भाग १

पुनर्कथन व चित्रांकन

**आबिद सुरती**

मराठी अनुवाद

**डॉ. उत्कर्षा मनिष**



# शेखी-शास्त्र

एक ब्राह्मण होता. त्यानं काशीला जाऊन ज्ञान प्राप्त केलं होतं. तो कामाच्या शोधात होता.

एके दिवशी त्याला शेजारच्या गावातून आमंत्रण मिळालं. तो कथा सांगायला तिथे पोहोचला. तो आलेला पाहून गावातील पंच एकत्र जमले आणि त्याला त्या गावाच्या पाटलाकडे घेऊन आले.

तिथे त्याची राहण्याची सोय झाली. दुपारी मस्त भोजन मिळालं. तासभर आराम करून ब्राह्मण बैठकीच्या खोलीत आला. गावकऱ्यांनी विचारलं, ''पंडित महोदय, आपण आम्हाला काय ऐकवणार?''

तो म्हणाला, ''आम्ही तुम्हांस भागवत कथा ऐकवू. खऱ्या धर्माचा मार्ग दाखवू.''

तेव्हा पाटील म्हणाला, ''अरे, ही तर चांगली गोष्ट आहे. तुम्ही आम्हाला रोज सायंकाळी कथा ऐकवा,  पण एक अट आहे.'' ब्राह्मण चमकला. पाटील पुढे म्हणाला, ''जर का आम्ही 'हरी नमो नम:' म्हणून थकलो तर तुम्हाला दक्षिणा म्हणून पाचशे रुपये देऊ आणि भागवत सांगताना तुम्ही थकलात तर तुम्ही तुमची पोथी इथेच सोडून परत जायचं.''

ब्राह्मण हसून म्हणाला, ''आम्हाला अट मान्य आहे.''

दुसऱ्या दिवसापासून ब्राह्मणानं भागवत कथा सुरू केली. तो एक श्लोक वाचे आणि त्याचा अर्थ समजावी. गावकरी एक सुरात 'हरी नमो नम:' बोलत. तो दुसरा श्लोक वाचे आणि त्याचा अर्थ समजावी. पुन्हा गावकरी 'हरी नमो नम:' एका सुरात म्हणत. ब्राह्मणाला खूप वाचावं लागत होतं. श्रोत्यांना समजावण्यासाठी खूप बोलावं लागत होतं. गावकरी मात्र एकत्र आणि एकदाच 'हरी नमो नम:' म्हणत. ब्राह्मण कथा सांगता-सांगता थकून गेला. सहा दिवसांनी त्याचा घसाही बसू लागला. सातव्या दिवशी एकदमच बसला.

खूप प्रयत्न केले पण आवाज फुटलाच नाही. शेवटी त्यानं आपली हार मानली. लगेच पाटील म्हणाला, ''महोदय... आपली पोथी इथे सोडा आणि चालते व्हा.''

बिचारा ब्राह्मण करणार तरी काय? भागवत ग्रंथ तिथेच ठेवून आपल्या गावी परतला. घरी पोहोचल्यावर त्याने आपल्या मोठ्या भावाला झालेला सर्व प्रकार सांगितला. मोठा भाऊ एकदम चतुर होता. त्याने शपथ घेतली की एका आठवड्यात भागवत परत नाही आणलं तर मिश्यांबरोबर शेंडीही काढून टाकीन. खरं तर मोठा भाऊ दोन इयत्तांपेक्षा जास्त शिकला नव्हता. त्याला वाचता येत नव्हतं. पण तो लंब्याचवड्या बाता मारण्यात चतुर होता. गावकऱ्यांना फसवायला त्याला चांगलंच येत होतं. दुसऱ्या दिवशी तो त्याच गावी पोहोचला आणि बैठकीत जाऊन बसला.



गावकरी त्याच्या पाया पडले! जेव्हा सर्व बसले तेव्हा पाटील मोठ्या आवेशानं म्हणाला, ''काय महाराज, तुम्हीही कथा सांगायला आला आहात? एक पंडित आपली पोथी इथेच सोडून गेला आहे. तुम्हालाही आपलं नाक कापून घ्यायचं असेल तर करा सुरुवात.''

तो म्हणाला, ''सर्व पंडित सारखे नसतात. कथे-कथेतही फरक असतो. मी शेखी-शास्त्राचा अभ्यास केला आहे. हे जाणणारा तुम्हाला शोधूनही सापडणार नाही.''

पाटील म्हणाला, ''तुम्हाला अट माहीत आहे का? जर आम्ही 'हरी नमो नमः' म्हणून थकलो तर तुम्हाला दक्षिणा म्हणून पाचशे रुपये देऊ आणि तुम्ही शास्त्र सांगताना थकलात तर तुम्ही तुमची शेखी-शास्त्राची पोथी इथेच सोडून जायची.''

''कबूल?''

होकार देत तो पुढे म्हणाला, ''माझीही एक अट आहे. मी जिंकलो तर दक्षिणेसोबत मला भागवत ग्रंथही तुम्ही द्यायचा जो आधीचा पंडित इथे सोडून गेला आहे.''

पाटलाबरोबर पंचही म्हणाले, ''कबूल.''

दुसऱ्या दिवशी त्याने कथेला सुरुवात केली. म्हणाला, ''ॐ नमः नारायण... विष्णू भगवान गरुडावर बसले. गरुड त्यांचं वाहन आहे.''

गावकरी म्हणाले, ''हरी नमो नमः''

भगवानांनी गरुडाला विचारलं...., ''तुम्हाला काही जात-बीत आहे का?''

''हरी नमो नमः''

गरुड उत्तरला ..... ''भगवान, मला जात नक्की आहे पण माझ्या भाऊबंदांनी मला जातीबाहेर काढलं आहे.''

''हरी नमो नमः'' आता भगवानांनी सर्व पक्ष्यांना एकत्र करून एका गोणीत बंद केलं.

''हरी नामो नमः''

''गोणीतील सर्व पक्षी घसा फोडून ची-ची ओरडू लागले.''

''हरी नमो नम:''

''गोणीला एक भोक होते.''

''हरी नमो नम:''

''भोकातून एक पक्षी निघाला आणि फुर्रकन् उडून गेला.''

''हरी नमो नम:''

''दुसरा पक्षी निघाला...''

''हरी.....''

''नंतर तिसरा.....''

''हरी.....''

''मग चौथा....''

''हरी.....''

''मग पाचवा....''

''हरी.....''

त्याचं फुर्र आणि गावकऱ्यांचं ''हरी नमो नम:'' चालूच राहिलं. शेवटी गावकऱ्यांचं तोंड दुखू लागलं. इतकंच नव्हे तर ''हरी नमो नम:''च्या ऐवजी ते ''फुर्र-फुर्र'' म्हणू लागले. तेव्हा त्याने आपली पोथी बंद करत घोषणा केली, ''तुम्ही लोक हरलात. आता मला दक्षिणेसोबत तो भागवत ग्रंथही मिळाला पाहिजे.''

पाटलानं त्याला भागवत ग्रंथ आणि पाचशे रुपये दक्षिणा दिली. तो घरी आला आणि त्याने आपल्या भावाला त्याची पोथी परत दिली.

# आनंदी कावळा

एक होता कावळा. एकदा तो महालात घुसून सिंहासनावर बसला. हे पाहून राजा चिडला. त्यानं हुकूम सोडला, ''त्या कावळ्याला बांधून दलदलीत फेका.'' शिपायांनी लगेचच आज्ञेचं पालन केलं. पण कावळा रडायचं सोडून गाऊ लागला. :-

**'दलदलीत घसरायला शिकतो मी**

**मी दलदलीत घसरायला शिकतो'**

चिखलात घालून सुद्धा कावळा मजेत गाऊ कसा शकतो याचं राजाला आश्चर्य वाटलं. त्यानं दुसरा हुकूम सोडला, ''याला विहिरीत फेका, म्हणजे हा बुडून मरेल.'' शिपायांनी तसे केले. पण कावळा दु:खी झाला नाही उलट हसू लागला.

**'विहिरीत पोहायला शिकतो मी**

**मी विहिरीत पोहायला शिकतो'**

याला कठोर शिक्षा केली पाहिजे असा राजानं विचार केला. या वेळी राजानं कावळ्याला काटेरी झुडपात घातलं, तरी कावळ्यावर त्याचा काही परिणाम झाला नाही.


तो त्याच सुरात म्हणाला,

**'काट्याने कान टोचतो मी**

**मी काट्याने कान टोचतो'**

राजा म्हणाला, ''काय उद्धट कावळा आहे! कसाही असू दे, हा दु:खी होतच नाही. आता हे बघू की जिथे सुख, चैन असते तिथे त्याला त्रास होतो का?'' त्याने कावळ्याला मुरांब्याच्या बरणीत घालायला सांगितलं. कावळ्याचे तर दिवसच पालटले !

तो उड्या मारत गाऊ लागला :-



**'स्वादिष्ट मोरांबा खातो मी**
**मी स्वादिष्ट मोरांबा खातो'**


शेवटी राजानं हार मानली. तो म्हणाला, ''या कावळ्याला शिक्षा देणं अशक्य आहे. याला सुख आणि दु:ख सगळं सारखंच. कोणत्याही परिस्थितीत आनंदी राहण्याचं रहस्य तो जाणतो. म्हणून त्याला आता सोडून द्या.'' कावळा उडून जवळच एका झाडाच्या फांदीवर जाऊन बसला आणि म्हणाला :

**'स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करतो मी**
**मी स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करतो.'**

# तीन तुमचे, दोन माझे

दोन भटजी होते. एक काका आणि दुसरा पुतण्या. एक दिवस दोघं शेजारच्या गावात जायला निघाले. तिथे पोहोचल्यावर एका शेठजीच्या घरी उतरले. शेठजीनं त्यांचं स्वागत-सत्कार केला आणि दोघांना म्हणाला, ''लाडू बनवून खा.'' काका-पुतण्याने मिळून बेसनाचे पाच मोठे-मोठे लाडू बनवले. आता दोघंही विचार करू लागले हे वाटून कसे घेणार? शेवटी दोघांनी ठरवलं की मौन पाळायचं. जो आधी बोलेल त्याला दोन लाडू, जो बोलणार नाही त्याला तीन लाडू. काका-पुतण्या न बोलता पाय पसरून झोपले. शेठजी येऊन पाहतो तर ना कोणी बोलत होतं ना हलत होतं. त्यांना बोलायला लावण्यासाठी अनेक प्रयत्न केले पण कोणीच तोंड उघडायला तयार नव्हतं. शेठजीनं विचार केला कदाचित कुठला तरी विषारी साप यांना डसला असेल! त्यानं आपल्या मुलांना बोलावून ही दुःखद बातमी सांगितली. मग ते म्हणाले, ''चला आपण सगळे मिळून या भटजींना स्मशानात घेऊन जाऊ.'' काका-पुतण्यानं हे ऐकलं. दोघं थरथरू व तळमळू लागले... ही तर आफत आली. पण बोलणार कसं? जो बोलणार त्याला दोनच लाडू मिळणार होते.


थोड्या वेळानं गावकरी जमा झाले. तिरडी बांधली गेली. काका-पुतण्याला करकचून बांधलं गेलं, पण दोघांमधलं कोणीही बोललं नाही. दोघंही श्वास रोखून पडून राहिले, जणू खरोखरीच मेले आहेत. रडत-रडत लोकांनी त्यांना स्मशानात आणलं. इथे चिता तयार होती. दोघांनाही चितेवर झोपवलं गेलं. नंतर जवळजवळ सर्व लोक नदीवर आंघोळ करायला गेले. तिथे थोडेच लोक थांबले.




बिचारा शेठजी रडत-रडत चितेला अग्नी द्यायला पुढे झाला. काका मनातल्या मनात बोलला... 'जळून खाक होईन पण दोन लाडू घेणार नाही. घेतले तर तीन नाही तर एकही घेणार नाही'. तिथे पुतण्या विचार करत होता.... 'तीन लाडू खाण्याच्या लोभात जीव जाईल. जीव राहिला तर जग आहे.' शेवटी तो ओरडला, ''धावा! तीन तुमचे आणि दोन माझे.'' एवढं बोलून काका-पुतण्या उठून बसले. त्यांना चितेवर बसलेले पाहून शेठजी ओरडला, ''भूत! ही दोन भुतं आहेत.'' आणि सगळेजण मागे न बघता धावत सुटले. काका-पुतण्या शेठजीच्या घरी लाडू खायला पोहोचले. तीन काकाचे, दोन पुतण्याचे!

# कडमकुडूम

एक होती चिमणी आणि एक होता कावळा. चिमणीचं घर होतं मेणाचं तर कावळ्याचं घर होतं शेणाचं. पावसाळा सुरू झाला. खूप जोरात पाऊस आला. छतावर टप टप आवाज करू लागला. झाडांवरून पाणी टप टप पडू लागलं. नाल्यात झुळूझुळू लागलं, नद्यांमध्ये खळखळ पाणी वाहू लागलं. जिथे तिथे पाणीच पाणी. चिमणीचं घर मेणाचं होतं. तिनं दरवाजा बंद केला आणि झोपली. पण कावळ्याचं घर होतं शेणाचं. त्यात पाणी घुसलं. घर वाहून गेलं. बिचारा कावळा, उडून एका झाडाच्या फांदीवर जाऊन बसला. त्या फांदीच्या समोर चिमणीचं घर होतं. कावळ्याची नजर त्यावर पडली. त्यानं विचार केला, 'आजची रात्र चिमणीच्या घरी काढू.' कावळा चिमणीच्या घराचं दार ठोठावू लागला. ''चिऊताई, चिऊताई, दार उघड.'' चिमणी म्हणाली. ''थांब बाबा कावळेदादा, मी माझ्या बाळाला आंघोळ घालते.'' थोड्या वेळानं पुन्हा कावळ्यानं दरवाजा ठोठावला. ''चिऊताई, चिऊताई, दार उघड.'' चिमणी म्हणाली, ''थोडा धीर धर, मी माझ्या बाळाला खाऊ घालते.'' कावळ्यानं जांभया दिल्या. पुन्हा कडी वाजवली, ''चिऊताई, चिऊताई, दार उघड.'' चिमणी म्हणाली, ''सांगितलं ना धीर धर म्हणून! मी बाळाला झोपवते आहे.'' कावळा गप्प बसला.





पण जास्त वेळ चूप राहू शकला नाही. पुन्हा त्यानं कडी वाजवली, ''चिऊताई, चिऊताई, दार उघड.'' शेवटी वैतागून चिमणीनं दरवाजा उघडला. कावळा थंडीनं कुडकुडत होता. चिमणीनं विचारलं, ''कुठे बसशील? भाताच्या घागरीत का गव्हाच्या मडक्यात? कावळा म्हणाला, ''डाळीच्या हंड्यात.'' रात्री सगळे झोपल्यावर कावळे दादा डाळ खाऊ लागला - कडमकुडूम. हा आवाज ऐकल्यावर चिमणीला जाग आली. म्हणाली, ''कडमकुडूम कोण करतं आहे?'' ती चारही बाजूला पाहू लागली. तेव्हा आवाज बंद झाला. चिमणी झोपी गेली. थोड्या वेळानं पुन्हा आवाज सुरू झाला. कडमकुडूम. पुन्हा चिमणी जागी झाली. तिनं सगळीकडे पाहिलं. तेव्हा आवाज बंद झाला. रात्रभर असाच आवाज येत राहिला. प्रत्येक वेळी चिमणी विचारात पडे, 'कडमकुडूम कोण बरं करत असावं?' मग आवाज बंद होत असे.



सकाळ झाली. कावळेदादा काव-काव करत उडून गेला. चिमणीनं हंडा बघितला, तर त्यात डाळीचा एकही दाणा उरला नव्हता.

# जे करता येतं ते करावं

एक कावळा होता. तो रोज नदी किनारी जाऊन बगळ्याला नमस्कार करी. हळूहळू दोघांमध्ये दोस्ती जमली.

बगळा मासे पकडण्यात पटाईत होता. तो विलक्षण पद्धतीनं रोज नवीन नवीन मासे पकडी आणि कावळ्याला खायला घाली. कावळ्याचे दिवस पालटले. त्याला दर दिवशी नवीन भोजन मिळू लागलं.

बगळा आकाशात उडे पण त्याची नजर खाली असे. मासा दिसताच तो वेगानं खाली येई. आपली लांब चोच पाण्यात घाली आणि उंच पायानं पटकन मासा पकडून किनाऱ्यावर येई. कावळा हे सर्व पाहत असे. आपणही असे मासे पकडावे असं त्याच्या मनात येई. मनातल्या मनात तो विचार करी,  यात काय मोठे आहे? वर उडायचं, नजर खाली रोखायची, मासा दिसताच लगेचच खाली यायचं, चोच उघडून पाण्यात घालायची आणि खाली डोकं वर पाय करायचे. मासा चोचीत नाही येणार तर जाणार कुठे?



हा सर्व विचार करून एक दिवस कावळा आभाळात उडाला. खूप उंच उडाला आणि वेगानं खाली आला. पाय वर ठेवत चोच खाली करून माशावर तुटून पडला.

पण मासा सटकला.

कावळ्याची चोच मात्र शेवाळं आणि वेली यात अडकली. पाय वर राहिले. कावळा तडफडू लागला. चोच  सोडवण्याचे त्यानं खूप प्रयत्न केले. पण डोकं पाण्यात बुडतच गेलं. तेव्हा बगळा तिथे आला. त्याला दया आली. मोठ्या कष्टानं त्यानं कावळ्याला पाण्याच्या बाहेर काढलं आणि म्हणाला,

**' जे करता येतं ते करावं**
**फुका नक्कल करू नये**
**वेलात चोच फसेल**
**पाय लाकूड बनतील'**

कावळा समजला.

अकलेवाचून नक्कल करणं म्हणजे जीव धोक्यात घालणं.





# फूफू बाबा

एक ब्राह्मण होता. त्याला एक मुलगा होता. एक दिवस पिता-पुत्र शेजारच्या गावात जायला निघाले. चालता-चालता रस्ता विसरले आणि घनदाट अरण्यात पोहोचले. त्या जंगलात एक हडळ राहत असे. दोघांना जोराची भूक लागली होती. दोघंही हडळीच्या घरी पोहोचले. हडळ घरीच बसली होती. तिला पाहून पिता-पुत्र घरात एका कोपऱ्यात ठेवलेल्या रांजणात लपले.

दुपारी हडळ बाहेर गेली आणि दुधाची किटली घेऊन परतली. मग तिनं खीर बनवली. खीर गरम होती. तिनं ती थंड करत बाजूला ठेवली. मुलाला खूप कडाक्याची भूक लागली होती. खीर पाहून त्याच्या तोंडाला पाणी सुटलं. खायला तो उतावीळ झाला. तो वडलांना म्हणाला, ''बाबा, आता मला नाही राहवत. मी बाहेर पडून खीर खाणार. मला हडळीनं खाल्लं तरी चालेल.''



वडील म्हणाले, ''ठीक आहे. पण हळूच बाहेर पड. हडळीच्या डाव्या बाजूला बसून खीर खा. तिला डावा डोळा नाही. म्हणून ती तुला पाहू शकणार नाही.''

मुलगा हळूच बाहेर पडला. गरम खिरीच्या भांड्यात हात घातल्याक्षणी, त्याचा हात भाजला. तो हातावर फुंकर मारू लागला. फू फू आवाज येऊ लागला.


हडळीनं असा आवाज आधी कधी ऐकला नव्हता. ती एकदम घाबरली. 'माझ्या घरात कोण घुसलं आहे?' असा तिनं विचार केला. खरंच कोणीतरी फू फू बाबा असावा. कदाचित मोठा जादूगार असावा. तिनं धूम ठोकली!

रस्त्यात तिला कोल्हा भेटला. त्यानं विचारलं, ''अगं ए भुताची बहीण! अशी वेगात कुठे चालली आहेस?'' ती म्हणाली, ''आता काय सांगू, माझ्या घरात फू फू बाबा घुसला आहे. मी इतकी छान खीर बनवली होती पण माझ्या नशिबात असेल तर ना!'' कोल्हा म्हणाला, ''घाबरू नकोस. चल मी तुझ्या बरोबर येतो. हडळीच्या घरात घुसण्याची हिंमत केली तरी कोणी? तुला तर अख्खं जग घाबरतं.''

हडळ आणि कोल्हा दोघं घरी पोहोचले. कोल्ह्यानं चारही बाजूला पाहिलं. पण कोणीच दिसलं नाही. हो, रांजणातून फू फू आवाज जरूर येत होता. मुलगा अजूनही भाजलेल्या हातावर फुंकर मारत होता. कोल्हा म्हणाला, ''हूंऽऽऽ कोणीतरी आहे खरं. चिंता करू नको. मी रांजणात डोकावून पाहतो.'' कोल्हा पुढे झाला आणि रांजणावर चढला. तो आत उतरू लागला. जसजशी कोल्ह्याची शेपटी जवळ आली, तशी आत बसलेल्या ब्राह्मणानं ती पिरगळली.

कोल्हा ओरडू लागला, ''बाप रे बाप! रांजणात तर पिळवटणारा बाबा बसला आहे! धावा रे धावा. हा तर तुझ्या फू फू बाबाचाही बाप दिसतो.'' पण कोल्हा धावणार तरी कसा? त्याची शेपटी तर ब्राह्मणाच्या हातात होती. ती सोडवून घेण्यासाठी कोल्ह्यानं असा काही जोर लावला की ती शेपटी तुटली. कोल्हा आणि हडळ आपला जीव वाचवत धावत सुटले.

नंतर ब्राह्मण आणि त्याचा मुलगा रांजणातून बाहेर आले. खीर खाऊन झाल्यावर आरामात घरी पोहोचले.



# वाघाचे भाचे

एक होती म्हातारी. एक दिवस ती रानात लाकडं गोळा करायला गेली. तिथे कलिंगडाच्या वेली पसरल्या होत्या. त्यातल्या एका पिकलेल्या कलिंगडाचा वास सगळीकडे दरवळत होता. म्हातारीच्या तोंडाला पाणी सुटलं. तिनं कलिंगड तोडलं आणि घरी आणलं. आंघोळ करून ती खायला बसणार तेवढ्यात कलिंगड बोलायला लागलं, ''आई, मला खाऊ नकोस. मी तुझा लाडका आहे.'' म्हातारी विचारात पडली. तेव्हा या कलिंगडातून एक बालक बाहेर आलं. म्हातारीनं त्याचं नाव राजा ठेवलं.

दोन दिवसांनंतर म्हातारी रानात गेली आणि दुसरं कलिंगड घेऊन आली. आंघोळ करून खायला बसणार, तेवढ्यात कलिंगड बोललं, ''आई, मला खाऊ नकोस मी तुझा लाडका आहे.'' म्हातारी विचारात पडली. तेवढ्यात कलिंगडातून एक बालक बाहेर आलं. म्हातारीनं त्याचं नाव रणवीर ठेवलं. थोड्या दिवसांनी पुन्हा म्हातारी वनात गेली. पुन्हा एकदा कलिंगड तोडून आणलं. आंघोळ करून खायला बसणार इतक्यात कलिंगड बोललं, ''आई, मला खाऊ नकोस. मी तुझा लाडका आहे.'' म्हातारी विचारात पडली. तेव्हा कलिंगडातून बालक बाहेर आलं. म्हातारीनं त्याचं नाव गामा ठेवलं. महिन्यानं पुन्हा म्हातारीचं रानात जाणं झालं. तिथून ती मस्त कलिंगड घेऊन आली. आंघोळ करून ती खायला बसणार तेवढ्यात कलिंगडातून आवाज आला, ''आई, मला खाऊ नकोस. मी तुझा लाडका आहे.'' म्हातारी विचारात पडली. त्या कलिंगडातून एक सुंदर बालक बाहेर पडलं, म्हातारीनं त्याचे नाव शूरवीर ठेवलं. आता कलिंगडाचा मोसम संपत आला होता.



म्हातारीनं विचार केला आणखी एकदा प्रयत्न करू. कदाचित गोड कलिंगड मिळेल. ती रानात गेली आणि एक छोटंसं कलिंगड बोललं, ''आई, मला खाऊ नको. मी तुझा लाडका आहे.'' तेव्हा त्या कलिंगडातून एक छोटंसं बालक बाहेर आलं. म्हातारीनं त्याच ंनाव छोटू ठेवलं. ही पाचही मुलं भराभर मोठी होऊ लागली. बघता बघता ते उंच-तगडे तरुण बनले. एक दिवस म्हातारी रानात फुलं वेचायला गेली. तिथे तिला वाघ भेटला. तो म्हणाला, ''मी जंगलाचा राजा आहे. मी तुला खाणार.'' म्हातारी म्हणाली, ''तू मला कसं काय खाऊ शकतोस? तू तर माझा भाऊ आहेस. मला खाल्लंस तर तुझे भाचे अनाथ होतील. ''धूर्त वाघानं विचार केला, 'त्या हडकुळ्या म्हातारीला खाण्यापेक्षा तिच्यासकट भाच्यांनाही खाईन.' तो म्हणाला, ''मी कसं मानू, मला भाचे आहेत म्हणून? म्हणून खात्री करून घेण्यासाठी मी उद्या संध्याकाळी तुझ्या घरी येईन.''



''सर्व भाच्यांना जेवूखाऊ घालून तयार ठेव.''

''म्हातारी म्हणाली, ''हो महाराज.''

घरी आल्यावर तिनं आपल्या मुलांना सगळी कहाणी सांगितली आणि त्यांना सावध केलं. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी वाघ घरी आला. भाच्यांनी मामाचं स्वागत केलं.

मग ते मामाला म्हणाले, ''मामा, मामा, आम्हाला गाणं ऐकव ना.'' वाघानं घसा खाकरला आणि सुरुवात केली.



'पहिला खाईन राजा -  रणवीर
नंतर खाईन गामा- शूरवीर
नंतर खाईन छोटूला
शेवटी खाईन म्हातारीला'

नंतर वाघ, भाच्यांना म्हणाला, ''आता तुम्ही गाणं ऐकवा'' भाच्यांनी लगेच सुरुवात केली....

हात धरतील राजा रणवीर
पाय पकडतील गामा शूरवीर
डोके उडवेल छोटू
कबर खोदेल म्हातारी

हे ऐकून वाघाची पाचावर धारण बसली. त्यानं अशी काही धूम ठोकली की वळून एकदाही पाहिलं नाही.



गिजुभाई बधेका (१८८५-१९३९) हे प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ होते, देशभक्त होते आणि मुख्य म्हणजे बालसाहित्याचे लेखक म्हणून त्यांची विशेष ख्याती होती. गांधीजींच्या कार्यात त्यांचा सहभाग होता. त्यांची 'बाल -केंद्रित शिक्षणा'ची विचारप्रणाली आजही अनेक शिक्षणतज्ज्ञांना महत्त्वाची वाटत असते. त्यांनी लिहिलेल्या बाल-साहित्याचा दरवळ गुजरातच्या सीमा ओलांडून आता सर्वदूर पोहोचलेला आहे. आबिद सुरती यांनी संपादित केलेल्या गिजुभाईंच्या गोष्टी या पुस्तकात पुन्हा सांगितल्या आहेत. आपल्या आजी-आजोबांनी सांगितलेल्या गोष्टींसारख्याच या गोष्टी आपल्याला आनंद देतात. या गोष्टींमधील मजेदार चित्रं छोट्या वाचकांना वेगळाच आनंद देतील.

**टप्याटप्याने वाचायला शिकणे. या पुस्तकाची वाचन पातळी ३ आहे.**

**प्रारंभिक वाचन / मुलांना वाचून दाखवण्यासाठी**
वाचायला नुकतीच सुरुवात करणाऱ्या आणि गोष्ट ऐकायला आवडणाऱ्या छोटुकल्यांसाठी.
**१**

**वाचायला शिकणे**
ओळखीचे शब्द वाचू शकणाऱ्या आणि मदत घेऊन नवे शब्द वाचणाऱ्या मुलांसाठी.
**२**

**स्वतंत्रपणे वाचन**
आपले आपण वाचणाऱ्या मुलांसाठी.
**३**

**सराईतपणे वाचन**
आत्मविश्वासानं वाचणाऱ्या मोठ्या मुलांसाठी.
**४**

**PRATHAM BOOKS**
प्रथम बुक्स ही ना-नफा संस्था असून मुलांमध्ये वाचनाची आवड रुजावी यासाठी अनेक भारतीय भाषांमध्ये पुस्तकं प्रकाशित करते.
www.prathambooks.org
The Phoo-Phoo Baba And Other Stories
Volume-I
(Marathi)
MRP: ₹ 35.00
ISBN 978-93-5022-192-1
9 789350 221921